सकाळ
सिंधुदुर्ग, गुरुवार,
१५ जानेवारी २०१५
४

# फूड फेस्टिव्हल, जिन्स डेची धूम

## दोडामार्गात युवा महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद



दोडामार्ग : येथे युवा महोत्सवात विविध वेशभूषेतील हळबे महाविद्यालयातील विद्यार्थी.

दोडामार्ग, ता. १४ : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील तरुणाई सध्या विविध डे आणि महोत्सवी कार्यक्रमांमध्ये दंग आहे. युवावर्गाच्या कलागुणांना वाव देणारा 'युवा महोत्सव' शुक्रवारपर्यंत (ता. १६) चालणार आहे.

महोत्सवाची सुरवात शुक्रवारी (ता.९) क्रीडा महोत्सवाने झाली. रविवारी (ता. ११) पारंपरिक दिवसाचे औचित्य साधून इतिहास, पुराण आणि वास्तवातील अनेक व्यक्तिरेखा विद्यार्थ्यांनी सादर केल्या. महाविद्यालयापासून बाजारपेठेतून शोभायात्रा काढण्यात आली.

सोमवारी (ता. १२) सारी डे, टाय डे, बँगल्स डे, चॉकलेट डेचे आयोजन झाले. महाविद्यालयाचा परिसर विविध रंगांनी उजळून निघाला होता. गोव्यातील पथितयश लेखिका सौ. पौर्णिमा केरकर यांच्या काव्य वाचनाने विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

तरूणाईने आज 'फन अँड फूड'चा अनुभव घेतला. फूड फेस्टिव्हलच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पाककृती सादर केल्या. परीक्षकांसह सर्वांनी पाककृतीचा आस्वाद घेतला. तसेच फ्रेंडशिप डे, कपडे, जिन्स डे ची धूनही पाहावयास मिळाली.

दरम्यान, बुधवारी (ता. १४) गॅदरिंग इव्हेंटची निवड, साहित्यिक गप्पा (लेखक घडताना), गुरुवारी (ता. १५) गॅदरिंग इव्हेंटची अंतिम निवड, तर शुक्रवारी (ता. १६) फिशपॉण्ड (शेला पागोटे) पारितोषिक वितरण आणि दुपारी सप्तरंग सांस्कृतिक महोत्सव होणार आहे. आठवडाभरात युवा महोत्सवात युवाईला व्यक्त होण्याची संधी महाविद्यालयाने दिली आहे.